# महाराष्ट्र शासन

जा.क्र.टिपीएस-१८१४/प्र.क्र.८२/१४/भाग-३/नवि-१३
नगर विकास विभाग, विस्तारित इमारत,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- १९/०६/२०१८.

प्रति,

१) आयुक्त, सर्व महानगरपालिका (ई-मेल द्वारे).
२) मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा,
(संचालक, नगरपालिका प्रशासन यांचे मार्फत).
३) मुख्यकार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
४) मुख्यकार्यकारी अधिकारी,
महानगरप्रदेश विकास प्राधिकरणे, पुणे / मुंबई / औरंगाबाद / नाशिक / नागपूर.
५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, कोकण भवन, नवी मुंबई.

**विषय :** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे मधील कलम-५२ नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषीत करण्यासाठी अधिनियमाचे कलम-१५८(१) अन्वये केलेले नियम.

**संदर्भ :** बृहन्मुंबई / नाशिक / भिवंडी-निजामपूर महानगरपालिका यांचे कडून प्राप्त प्रस्ताव.

महोदय,

राज्यातील नागरी भागातील दि.३१/१२/२०१५ पुर्वीच्या बेकायदेशिर बांधकामांना प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मध्ये सुधारणा करुन कलम-५२(अ) नव्याने समाविष्ट करण्यात आलेला असून याअंतर्गत कलम-१५८(१) नुसार तयार केलेले विनियमास शासनाने दि.०७/१०/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूरी दिलेली असून याबाबतचे प्रसिध्दीकरण दि.१०/१०/२०१७ रोजीच्या शासन राजपत्रात करण्यात आलेले आहे. सदर विनियमाच्या अनुषंगाने करावयाचे प्रसिध्दीकरणासाठी मुदतवाढ, अर्ज घेण्यासाठी मुदतवाढ मंजूर करणेबाबत संदर्भित अन्वये काही नियोजन प्राधिकरणांनी शासनास विनंती केलेली आहे. यानुषंगाने उपस्थित झालेल्या मुद्याबाबत खालील प्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मुद्दा | शासनाचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १) | दि.०७/१०/२०१७ रोजी मंजूर केलेल्या विनियमातील तरतूदी नुसार दि.३१/१२/२०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करणेसाठी तरतूद क्र.९ नुसार करावयाच्या प्रसिध्दीकरणासाठी मुदतवाढ मिळणे. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम-५२(अ) तसेच कलम-१५८ मधील तरतूदी नुसार दि.०७/१०/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर केलेले इंग्रजी विनियम दि.१०/१०/२०१७ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात तर मराठी विनियम दि.२०/०२/२०१८ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. उक्त विनियमातील तरतूद क्र.९ नुसार करावयाचे प्रसिध्दीकरणासाठी सदरचे विनियम राजपत्रात मराठीमध्ये प्रसिध्द |

| | | |
|---|---|---|
| | | झालेल्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत म्हणजेच दि.१९/०८/२०१८ पुर्वी याप्रमाणे प्रसिध्दीकरण न केलेल्या सर्व नियोजन प्राधिकरणांनी कार्यवाही करणे बंधनकारक राहील. |
| २) | दि.०७/१०/२०१७ रोजी मंजूर केलेल्या विनियमातील तरतूद क्र.९ नुसार दि.३१/१२/२०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करणेसाठी केलेल्या प्रसिध्दीकरणात नमूद केलेला अंतिम दिनांक वाढविणेसाठी मुदतवाढ मिळणे. | दि.०७/१०/२०१७ रोजीच्या विनियमातील तरतूद क्र.९ मध्ये दि.३१/१२/२०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करणेसाठी अर्ज मागविणेसाठी करावयाच्या प्रसिध्दीकरणासाठी सहा महिन्यांची कालमर्यादा नमूद केली आहे. या प्रसिध्दीकरणामध्ये अर्ज सादर करणेसाठी किती कालावधी द्यावयाचा याबाबत संबंधित नियोजन प्राधिकरणांनीच निर्णय घेणेचा आहे. त्यामुळे यामध्ये मुदतवाढविणेसाठी संबंधित नियोजन प्राधिकरणानी त्यांचे स्तरावर कार्यवाही करणे अपेक्षित आहे. तथापि उपरोक्त मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केलेली प्रसिध्दीकरणाबाबतची मर्यादा दिनांक १९/०८/२०१८ पासून अर्ज घेण्याचा दिनांक साधारणपणे सहा महिने व यापुढे संपुर्ण कार्यवाही पुर्ण करणेकरीता साधारणपणे १ वर्ष विचारात घेवुन सर्व नियोजन प्राधिकरणांनी यानुषंगीक विनियमानुसार त्यांचे कार्यक्षेत्रातील दि.३१/१२/२०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करणेची कार्यवाही दि.१८/०२/२०२० पुर्वी पुर्ण करणे आवश्यक राहील. |

आपला,

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत** :- मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.